उद्योग भारती
उद्योजकता विकास व प्रशिक्षण विभाग
ENTREPRENEURSHIP TRAINING & CONSULTANCY DIVISION

कृषि-पदवीधर संघटना
AGRICULTURE GRADUATES ASSOCIATION
Graduate's | Farmers | Agri Professionals

२०-२१ महाकृषि यात्रा
प्रशिक्षण | पर्यटन | प्रदर्शन | प्रबोधन

# सभासद अर्ज

स्व:ताचा पासपोर्ट साईज फोटो येथे चिकटवावा व सदर अर्ज बाणेर पुणे मुख्य कार्यालय येथे जमा करावा.

१. संपूर्ण नाव: ____________________

२. संपूर्ण पत्ता पिनकोड सह: ____________________

३. काम करीत असलेल्या ठिकाणाचा पत्ता व कंपनी अथवा समूहाचे नाव: ____________________

४. पदवी अथवा पदविका पूर्ण केलेले महाविद्यालय: ____________________

५. पदवी अथवा पदविका पूर्ण केलेले विद्यापीठ: ____________________

६. शालेय शिक्षण पुर्ण केलेले वर्ष: ____________________

७. आपल्या कुटुंबात किती व्यक्ती प्रत्यक्ष शेती अथवा शेती व्यवसाय करतात : ☐

८. आपल्या कुटुंबातील किती व्यक्ती पदवीधर, पदविकाधारक आहेत: ☐

९. कृषि पदवीधर संघटनेचे सदस्य का होऊ इच्छिता संघटनेचा उद्देश माहिती आहे का ? ☐

१०. संघटनेचे विविध विभाग व त्यांची कार्ये माहिती आहेत का ? ☐

**देणगी शुल्क**

**वार्षिक सक्रिय सदस्य देणगी २३०० /- (पाच वर्षे सलग देणगी देणारे व सक्रिय सदस्य हे आजीवन सदस्य म्हणून ग्राह्य धरले जातात.)**

**आजीवन सदस्य देणगी - १०,०००/- (आजीवन सदस्य देणारे सदस्य जर सलग पाच वर्षे समाधानकारक सक्रिय असतील तर त्यांचा कोअर कमिटी अथवा संचालक मंडळात समावेश शक्य असतो ')**

इ मेल आय डी: ____________________

स्वत:चा संपर्क क्रमांक : ____________________

कुटुंबातील व्यक्तीचा संपर्क क्रमांक : ____________________

व्हाट्स अप क्रमांक: ____________________

**सभासद होण्यासाठी चे नियम:**

१. AGRICULTURE GRADUATES ASSOCIATION म्हणजेच कृषि - पदवीधर संघटना हि कृषि अथवा संलग्न पदवीधर, पदविकाधारक, शेतकरी युवक (कोणत्याही शाखेतील पदवीधर असलेले अथवा नसलेले), कृषि उद्योजक (कोणत्याही शाखेतील पदवीधर असलेले अथवा नसलेले), महिला पुरुष कोणत्याही जाती धर्मांचा भारतीय नागरिक या संघटनेचा सभासद होऊ शकतो. या सभासदांचे शैक्षणिक, उद्योजकीय, रोजगार अथवा कृषि व संलग्न विघापीठे त्यातुन बाहेर पडणारे पदवीधर व शेतकरी क्षेत्रातील प्रश्न लोकशाही मार्गाने मांडण्यासाठी या संघटनेची संस्थेची निर्मिती झाली आहे.

२. देणगी शुल्क दिनांक ३१ मार्च रोजी प्रत्येक वर्षी नव्याने नूतनीकरण करावे लागेल, नमूद दोन वर्गाचे अथवा आजीवन शुल्क देणगी पुन्हा कोणत्याही कारणास्तव मिळणार नाही. शुल्क भरलेले नसल्यास अधिक सभासदत्व मिळणार नाही.

३. सभासद राजकीय पक्षाचा प्रतिनिधी नसावा त्याने संस्थेच्या सभासदांच्या राजकारण न आणता संस्थेच्या संघटनेच्या प्रगती करता योगदान देणे अपेक्षित आहे.

४. संस्थेचे संचालक मंडळ हे विश्वस्त असून अध्यक्ष आणि सचिव व कोषाध्यक्ष यांच्या कडे सर्व प्रशासकीय अधिकार राखीव आहेत.
हे सभासद संघटनेचे सार्वभौम लाभार्थी आहेत. याच बरोबर आजीवन सदस्य हे संघटनेचे कोअर कमिटी सदस्य आहेत. दोन्ही प्रकारचे सभासद हे स्वयंसेवेने पदाधिकारी म्हणून योगदान देऊ शकतात.

५. सभासदत्व स्वीकारणे रद्द करणे अथवा घटनेस अनुसरून आणि संचालक मंडळाच्या अधिकाराधीन असेल. सर्व स्तरातील सदस्यांना मासिक बैठक, त्रैमासिक बैठक आणि वार्षिक मेळावे आणि बैठकांना उपस्थित राहणे बंधनकारक असेल.

६. सर्व सदस्यांनी सदस्य झाल्यानंतर संघटनेची व विविध विभागांची आचारसंहिता आणि विविध समित्या आणि बैठकांचे मेळाव्यांचे स्वरूप समजून घेऊन कार्यरत राहणे बंधनकारक आहे.

" एकच ध्यास कृषि व पदवीधरांचा विकास "

## विद्यार्थी व युवक, सचिव व जिल्हा पदाधिकारी आचारसंहिता

१. विद्यार्थी पदाधिकारी हा प्रथम वार्षिक सदस्य असावा. कोणता हि विद्यार्थी जो महाविद्यालयीन शिक्षण घेत आहे, त्याला शाखा प्रमुख म्हणून महाविद्यालय संपे पर्यंत जबाबदारी देण्यात येईल. विद्यार्थ्यांची प्रश्न त्यांनी संघटनेच्या माध्यमातून मांडणे अपेक्षित आहे. शाखा प्रमुख हे विद्यार्थी संघटनेतील महत्वाचे पद असेल. सर्व शाखांचा मिळून एक विभागीय अध्यक्ष व सर्व विभागीय अध्यक्ष मिळून एक प्रदेशाध्यक्ष ठरवला जाईल. विद्यार्थी संघटनेत २०१८ नंतर तालुका जिल्हा अध्यक्ष हे पद अस्तित्वात नाही. विद्यार्थी पदाधिकारी वयोगट २० ते २८ आहे. महविद्यालयात शिक्षण घेणारे विद्यार्थी यांची सदस्य देणगी ५०० रू. आहे.

२. कोणताही विद्यार्थी प्रतिनिधी ज्याने महाविद्यालय स्तरावर काम केले आहे, त्याने महाविद्यालयातील वाटचाल संपल्या नंतर युवक आघाडी मध्ये काम करावे. युवक चा कोणताही पदाधिकारी संघटनेचा आजिवन सदस्य असणे गरजेचे आहे. युवक पदाधिकारी यांनी आपल्या जिल्हा आणि तालुक्यातील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची सदस्य नोंदणी आणि आणि पदे निश्चिती तसेच संघटनेच्या विविध विभागातील त्यांच्या कार्यक्षेत्रातील कार्यक्रमांना उपस्थित राहावे व जबाबदारीने कार्यरत राहावे. युवक वयोगट २७ ते ३५ आहे.

३. जिल्हा तालुका अध्यक्ष हे संघटनेचे जिल्ह्यात प्रतिनिधित्व करतील. विद्यार्थी शाखा अध्यक्ष आणि युवक जिल्हा अध्यक्ष हे संघटनेचे जिल्हा अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली काम करतील. जिल्हा अध्यक्ष हे आजीवन सदस्य असणे गरजेचे आहे. संघटनेची वाढ आणि त्या जिल्ह्यातील कार्यक्रम अथवा सर्व प्रशासकीय बाबी करता जबाबदार पदाधिकारी ते असतील. वयोगट ३५ ते ६०.

४. वर नमूद सर्व पदाधिकारी यांनी संघटनेच्या संस्थेच्या आपापल्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक कार्यक्रम आणि मेळावे अथवा बैठक तसेच इतर विभागाच्या उपक्रमांना प्रदर्शनात हजर राहणे गरजे चे आहे. संस्थेचे विश्वस्त पदाधिकारी अथवा संचालक मंडळ कार्यक्षेत्रात उपस्थित असताना त्यांनी गैरहजर राहू नये.

५. सदर पदाधिकारी यांनी सामाजिक, नैतिक आणि आर्थिक वर्तन संस्थेच्या इतर सदस्य पदाधिकारी विभाग यांच्या समवेत योग्य पद्धतीने ठेवावे. उलटसुलट बोलणे, कामाची जबाबदारी टाळणे, वरिष्ठांनी दिलेली जबाबदारी पार न पडणे, इतर सदस्यांच्या मताचा आदर न करता कार्यवाही करणे, परस्पर पत्रव्यवहार अथवा सहकारी सदस्यांना न विचारात बातम्या छापणे इत्यादी गोष्टींना थारा दिला जाणार नाही. सुसंवाद आणि योग्य वर्तन ठेवणाऱ्या पदाधिकाऱ्यांना नेहमी संघटना संस्था सोबत घेऊनच वाटचाल करेल.

६. अनावश्यक चर्चाना आमंत्रण देणारे, गुन्ह्यात शिक्षा झालेले, मानसिक रुग्ण, राजकीय अभिनिवेश असलेले सदस्य पदाधिकारी यांना सदस्य म्हणून राहता येणार नाही.

७. प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्च पूर्वी सर्व पदाधिकारी यांनी कामाचा अहवाल पुणे मुख्य कार्यालय येथे जमा करणे आवश्यक आहे. स्व:ताची देणगी फी चे नूतनीकरण करणे अवश्यक आहे. प्रत्येक वर्षात किमान १००
सदस्यांची नोंदणी प्रत्येक पदाधिकारी यांनी करणे आवश्यक किंबहुना अनिवार्य आहे.

८. संघटनेची वाटचाल करताना सदस्य आणि पदाधिकारी यांच्यात संस्थे कडून मुख्य दुवा म्हणून सचिव पद निर्माण केले असून, सचिव यांच्या अंतिम परवानगी शिवाय जिल्हा अध्यक्ष, तेथील सचिव, विद्यार्थी अथवा युवक अध्यक्ष यांनी कोणताही निर्णय घेऊ नये. कोषाध्यक्ष तथा खजिनदार यांच्याकडे वेळोवेळी हिशोब आणि जमाखर्चाची बिले प्रत्येक पदाधिकारी आणि सदस्य यांनी मुदतीच्या आत पदाधिकारी यांनी जमा करावीत.

९. २०१८ नंतर संघटनेत सोशल मीडिया व प्रसिद्धी प्रमुख हि पदे अस्तित्वात येत असून, संस्थे कडून प्रशिक्षित व्यक्तीनेच हि जबाबदारी पार पाडावी. इतर विभागाच्या उपक्रमांत स्वयंसेवेने योगदान देणाऱ्या पदाधिकारी यांना प्रवास खर्च व्यतिरिक्त व मानधन शिवाय इतर कोणताही खर्च दिला जाणार नाही.

१०. प्रत्येक वर्षी समूहाच्या प्रगतीत कार्यात उच्चकोटीचे योगदान देणाऱ्या सदस्य आणि पदाधिकाऱ्यांचा गौरव करण्यास संघटना संस्था कटिबद्ध आहे. किंबहुना अशा सदस्य व्यक्तींनाच संघटने मध्ये उच्च स्थान असेल. सर्वसामान्य व्यक्ती या संघटनेत संस्थेत महत्वाच्या पदांवर कार्यरत असाव्यात असे विचार करून संस्था यशस्वी वाटचाल करते आहे.

११. २०१२ ते आजतागायत अनेक सदस्यांनी पदाधिकाऱ्यांनी स्वत:चे योगदान देऊन हि संघटना उभी केली, या संघटनेत कार्यरत असतं कोणत्याही अमिषाशिवाय लोभाशिवाय कार्यरत राहावे. परंतु या एकत्रित योगदानातून संस्थेस मिळणारे लाभ हे सर्वांचे असणार आहेत.

१२. संस्थेच्या कोणत्याही विभागाच्या कोणत्याही उपक्रमांत सहभागी झालेले सदस्य ज्यांनी १०,००० रुपये या पेक्षा जास्त वर्गणी अथवा देणगी दिलेली आहे किंवा जास्त वर्गणी दिलेली आहे व कमान तीन वर्षे सक्रिय काम केलेले आहे त्यांना आजीवन सदस्य म्हणून संबोधले जाते. संस्थेच्या सलग तीन कार्यक्रम, बैठक, मेळावा, प्रदर्शने, इत्यादी मध्ये सहभागी न होणारे यांचे सदस्यत्व रद्द केले जाईल. गट तट राजकारण याला थारा दिला जाणार नाही. संघटनेची आर्थिक, भौतिक, सामाजिक प्रगती हेच सर्वांचे प्राधान्याने उद्दिष्ट असेल.संघटनेच्या पुणे मुख्य कार्यालयाकडून अधिकृत नियुक्ती पत्र सदस्य ओळख पत्र प्राप्त असल्यासच सभसदत्व ग्राहय धरण्यात येईल

**कृषि-पदवीधर संघटना सदस्य परिवारात आपले सहर्ष स्वागत**